Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# आदिवासी माना जमातीच्या मानवी हक्कांचा समस्या

**डॉ. ताराचंद माधव सावसाकडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि.जळगांव

m

**प्रस्तावना**

मानवी हक्क हे मानवाच्या जीवनामध्ये एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक व्यक्तीला 'मनुष्य प्राणी' या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत.[१] व्यक्ती हा समाजाचा घटक असल्याने तो समाजातच राहून आपला विकास करू शकतो. त्यामुळे एखाद्या समाजाला या मानवी अधिकारापासून वंचित ठेवल्यास त्या समाजातील लोकांचा विकास खुंटतो. पर्यायाने देशाचा विकास खुंटतो. लोकशाही व्यवस्था असलेल्या देशात या मानवी अधिकाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मानवी हक्कांची आवश्यकता असते. आज सर्व जाती समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होतांना दिसून येतो. सार्वजनिक ठिकाणी ज्या दलित समाजाला वर्षानुवर्षे नाकारले होते. त्या समाजातही आज शिक्षण, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात बदल घडून आला आहे. त्यांना नैसर्गिक मानवी हक्क प्राप्त झाले आहेत. परंतु आदिवासी माना जमात ही प्राचीन जमात असूनही या जमातीची परिस्थिती आजही जशीच्या तशीच आहे. या मानवी हक्काशिवाय व्यक्तीला योग्यरित्या आपले जीवन व्यथित करता येत नाही. मानवी हक्क म्हणजे जे व्यक्तीला जन्मानेच प्राप्त होतात आणि ते कोणीही राज्यसंस्था अथवा व्यक्ती हिरावून घेऊ शकत नाही.[२] ती व्यक्ती माणूस आहे म्हणूनच त्याला जगण्याकरीता निसर्गाने काही हक्क दिलेले आहे. हे मानवी हक्क जगातील सर्व व्यक्तीला कोणताही भेदभाव न करता प्राप्त झालेले आहेत.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानव अधिकार घोषणेच्या कलम १ ते २ मध्ये सर्व मानवी व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र आहेत व त्यांना समान प्रतिष्ठा व समान अधिकार असून वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर विचारप्रणाली राष्ट्रीय किंवा सामाजिक मुलस्थान, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा यासारखा कोणताही भेदभाव केला जाणार नाही.[३] कोणत्याही व्यक्तीचा विकास होण्यासाठी त्याला काही अधिकारांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे कोणत्याही जमातीचा विकास होण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेने १९९२ पासून आदिवासींच्या समस्यांकडे लक्ष देण्यास सुरूवात केली. या दरम्यानच्या कालखंडात कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व स्पेन या देशातील सरकारे व तेथील आदिवासी यात जमीन व प्राकृतिक संसाधनाच्या उपयोगावरून संघर्ष पेटला. स्पेन सरकारने आदिवासींच्या समस्या जगापुढे मांडण्याचे ठरविले. वाढत्या संघर्षामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक परिषदेने आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करण्याची जबाबदारी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे सोपविली. पुढे १८ डिसेंबर १९९० च्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने आदिवासीच्या सन्मानार्थ १९९३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय आदिवासी वर्ष म्हणून घोषीत केले. आदिवासींचे विविध प्रश्न जागतिक स्तरावर मांडण्यासाठी जुन १९९३ मध्ये व्हिएन्ना येथे मानवी हक्क विश्व संमेलन संपन्न झाले. या संमेलनात विविध देशातील आदिवासी प्रतिनिधींनी आपली मते मांडली. १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ठराव करून ९ ऑगस्ट हा दिवस प्रतिवर्षी आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन म्हणून साजरा करण्याचे घोषीत केले. १३ डिसेंबर २००७ साली संयुक्त राष्ट्रसंघटनेने एक जाहीरनामा घोषीत केला. या जाहिरनाम्यात स्वयंनिर्णयाचा अधिकार व सामुहिक मानवी हक्कांविषयक ४६ कलमांचा समावेश आहे.

आदिवासी जमातीतील लोकांना मानवी हक्क असले पाहिजे तेव्हाच त्या जमातीचा विकास होऊ शकतो. पर्यायाने देशाचा विकास होवू शकतो. माना जमातीच्या विकासासाठी संविधानात घटनात्मक तरतूदी असतांना देखील महाराष्ट्र शासनाने या जमातीला त्यांच्या मुलभूत संविधानिक अधिकार वापरण्यावर निर्बंध घातले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे जात पडताळणीचे आदेश असतांनाही या जमातीतील लोकांना हेतू पुरस्कर डावलले जात आहे. त्यामुळे त्यांच्या मानवी अधिकाराचे उल्लंघन होतांना दिसून येते. त्यामुळे या जमातीचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय आणि सांस्कृतिक विकास खुंटलेला दिसतो आहे. महाराष्ट्रातील माना आदिम जमात मानवी हक्कांपासून वंचित आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१)आदिवासी माना जमातीच्या मानवी हक्कांचा अभ्यास करणे.

२)माना जमातीला मानवी हक्कांचा लाभ झाला आहे की नाही? याचा शोध घेणे.

३)माना जमातीसाठी असणाऱ्या संविधानिक तरतुदींचा व हक्कांचा शोध घेणे.

४)माना जमातीत मानवी हक्कांविषयी जाणिव जागृती झाली की नाही? याचा शोध घेणे.

५)मानवी हक्क, नैसर्गिक हक्क असूनही आदिवासी माना जमात या मानवी हक्कांपासून वंचित का राहिला यांचा शोध घेणे.

**गृहितकृत्ये**

१) आदिवासी माना जमातीसमोर मानवी हक्कांच्या समस्या आहेत.
२) आदिवासी माना जमातीसाठी संविधानिक तरतूदी असून त्यांना त्यांच्या अधिकाराचा उपयोग करता येत नाही.
३) आदिवासी माना जमातीतील लोकांमध्ये मानवी हक्क व संविधानिक हक्कासंदर्भात जाणिव व जागृती नाही.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांवरील माहिती व सांकेतिक स्थळावरील माहितीचा उपयोग करून लघु शोधनिबंध तयार केला आहे.

**मानवी हक्क, अर्थ व स्वरूप**

जन्माने माणूस काही हक्क घेऊन येतो. या गृहितकृत्यावर मानवी हक्कांची मांडणी करण्यात आली.[४] व्यक्ती या अधिकाराशिवाय आपला सर्वांगीण विकास करू शकत नाही. हॉब्जच्या मते मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या जीवीताची विशेष सुरक्षितता होय.[५] त्याच्या मते हा हक्क अन्य कोणत्याही हक्कापेक्षा मुलभूत स्वरूपाचा आहे. जॉन लॉकच्या मते मनुष्यप्राणी हा मुळात मुक्त समान व स्वतंत्र आहे. म्हणून शांतता व सदिच्छा आणि परस्पर सहकार्य या स्वाभाविक स्थितीच्या अटी आहेत.[६] रॅन्डमहाऊस विश्वकोषात मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. बेल्यमच्या मते कायद्याने मान्य केलेली व्यक्तीची मागणी म्हणजे हक्क होय.[७] मानवी हक्कांच्या अभ्यासकांच्या मते मानवी हक्कांची संकल्पना जुनी आहे. रोमन तत्ववेत्ता सिसरो याने नैसर्गिक हक्कांचे समर्थन केले. सोळाव्या सतराव्या शतकामध्ये जॉन लॉक, रूसो, ह्युगो, ग्रोसियस हॉब्ज, मिल, बॅथम, लॉस्की या विचारवंतानी मानवी हक्कांचे समर्थन केले. आधुनिक काळात इंग्लंडमधील मॅग्न कार्टा, पिटीशन ऑफ राईटस, बोल ऑफ राईटस, अमेरिकन स्वातंत्र्याची सनद आणि फ्रेंच राज्यक्रांती या घटनामधून मानवी हक्कांची संकल्पना समोर आली. त्याचप्रमाणे वेस्टफालिया करार १६४८, व्हिएन्ना काँग्रेस १८१५, वॉशिग्टन करार १८६२, ब्रुसेल्स परिषद १८६७, १८९० व बर्लिन परिषदेतील दस्तऐवज १८८५ व जिनिव्हा संधी या मानवी हक्क संदर्भातील महत्त्वपूर्ण घटना आहेत.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या विपरीत वित्त व मानवी हानीमुळे जागतिक स्तरावर शांतता व मानवाच्या जीवीताची सुरक्षितता ठेवण्याच्या गरजेतून १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. या संघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी ३० कलमी मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रसिद्ध केला. हा जागतिक जाहिरनामा जगातील बहुतांश देशांनी स्वीकारून मानवी हक्कांच्या सुरक्षिततेसाठी कटीबद्ध झाले. भारतानेही स्वातंत्र्यानंतर आपल्या संविधानात मानवी हक्कांचा समावेश केला. त्यात नागरी स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक न्यायासंबंधी तरतुदी आहेत. प्रामुख्याने मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, राजकीय हक्क, सामाजिक सुरक्षितता, मुलभूत अशा सोई-सुविधांसह जीवन जगण्याचा अधिकार, सांस्कृतिक हक्कांचा समावेश आहे.

**आदिवासी समुदाय**

आदिवासी हा इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीझ' चा शब्दाचा रूढ मराठी पर्याय आहे. त्यांना वनवासी म्हणावे. आदिवासी म्हणू नये; असाही एक दृष्टिकोन आहे.[८] आदिवासींची वेगळी अस्मिता किंवा संस्कृती असून इतर नागरीकांप्रमाणेच आहेत. ते वनात वस्ती करून राहतात एवढाच त्यांना वेगळेपणा आहे. १९९१ सालच्या इंम्पीरिअल गॅझेट ऑफ इंडियामध्ये आदिवासी या शब्दाची व्याख्या केली आहे. या व्याख्येनुसार आदिवासी म्हणजे समान नावे धारण करणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या, समान भुप्रदेश ताब्यात असण्याचा दावा करणाऱ्या आणि मुळात अंतर्विवाही असली तरी सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या कुटुंबाचा समुदाय वा समुच्चय होय. अशी व्याख्या केली आहे. डी.एन. मुजूमदार यांनी आदिवासी (tribe) म्हणजे अशा कुटुंबाचा समुच्चय वा गट होय जो समान नाव धारण करतो. तिच्या सदस्यांकडे समान भूमी व प्रदेश असतो, जो समान भाषा बोलतो आणि विवाह, व्यवसाय यासंबधी काही विशिष्ट निषिध्द रूढींचे (taboos) पालन करतो आणि ज्यांनी परस्परसहकार्य आणि परस्पर कर्तव्याबाबतची योग्य मुल्यांकीत व्यवस्था विकसित केलेली आहे. भारताच्या राज्यघटनेतील कलम ३६६ (२५) नुसार अनुसूचित जमाती व जनजाती म्हणजे संविधानाच्या प्रयोजनार्थ कलम ३४२ खाली अनुसूचित जमाती असल्याचे मानले गेले आहे.[९] अशा जमाती किंवा जनजाती समाज अथवा जमाती वा जनजाती समाजाचे भाग अथवा त्यातील गट होय.

प्रत्येक आदिवासी जमातीला एक विविध असे नाव असते. भारतात विविध प्रदेशात निरनिराळ्या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. आसाममध्ये खासी, कुक्की, मुडा, अंबोर, बिहारमध्ये असू, वैगा, गोंड, गुजरातमध्ये भिल्ल, गोंड, कोळी तर मध्यप्रदेशमध्ये कोहलू, भिल्ल, गोंड, माना, झारखंडमध्ये संथाल, मुण्डा, खडीया, कोरबा तसेच महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातही आदिवासी जमाती आहेत. कातकरी आंथ, गोंड, माना, भिल्ल, पावरा, धनका, पारधी या जातीप्रमाणेच माना ही जमाती विदर्भाच्या चंद्रपूर, गडचिरोली या भागात आहे.

**आदिवासी माना जमात**

महाराष्ट्राच्या विदर्भ भागात इ.स.पूर्वी माना या जमातीचे अस्तित्व होते व आजही आहे. गोंड या जमातीच्या आधी म्हणजेच ६०० ते १२०० इ.स.दरम्यान माना या जमातीने राज्य केले याचे प्राचिन पुरावे आजही विदर्भाच्या दऱ्याखोऱ्यात, जंगलात आढळून

येतात. या जमातीचे मुळ स्थान, राजस्थान मधील गाव चिवान जिल्हा झंझून येथील मुळ रहिवासी होते. माना जमातीचा राजा गहलू याने गडचिरोली येथे माणिकगड किला बांधला. माणिकगडच्या मुख्य दरवाजाच्या कडेला असलेल्या नाग टोटम वरून माना हे नागावंशी आहे असे वर्णन आर.व्ही.रसेल यांनी आपल्या दि ट्रायबल ॲन्ड कॉस्ट ऑफ दि सेंट्रल प्रोव्हीजन ऑफ इंडिया या पुस्तकांत केले आहे. द्रविडीयन भाषेत माना या शब्दाचा अर्थ हत्ती असा होतो. म्हणून माना जमातीचा वंश ही नागवंशीयाची शाखा आहे. माना या शब्दाचे विश्लेषण केले असता 'मा' शब्दापासून 'मानकादेवी' व 'ना' शब्दापासून 'नारायनदेव' असा शब्द तयार होतो. हा शब्द माना जमातीतील पंचायनातील प्रमुख दोन देवतापासून निर्माण झाला आहे.[१०]

माना जमातीत आधी मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. परंतु आज मात्र पितृसत्ताक पद्धती दिसून येते. यामुळे कुळाची ओळख मातृसत्ताक कुळात आईच्या कुळाच्या नावाने तर पितृसत्ताक कुळात वडिलांच्या कुळ नावान ओळखले जाते. माना जमातीत ७२ आडनाव (कुळ) व २२ जोड आहेत. ७२ कुळांपैकी १७ कुळे लोप पावली असून ५३ कुळांनी आजही आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. माना जमातीची लोकसंख्या इ.स. १८६९ मध्ये २९१७५ एवढी होती. इ.स. १९७१ च्या जनगणनेनुसार अंदाजे ३ ते ४ लाख एवढी लोकसंख्या होती. इ.स. २०१५ नुसार माना जमातीची विदर्भातील म्हणजेच महाराष्ट्र, मध्यप्रदेश, झारखंड, आंध्रप्रदेश, ओरिसा या राज्यांच्या सिमेलगत लोकसंख्या ४ ते ५ लाखाच्या आत आहे. विदर्भाचा नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा, गोंदिया, यवतमाळ या जिल्ह्यात माना अदिम जमातीचे वास्तव्य आहे. बहुसंख्य माना जमात चंद्रपूर जिल्ह्याच्या चिमूर, नागाभिड, सिदेवाही, वरोरा, भद्रावती या तालुक्यात असून माना जमातीचे आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवन आजही प्रगत समाजापेक्षा खालावलेले आहे. या जमातीचे लोक वैयक्तिक किंवा सामुहिक पद्धतीने शिकार व शेती करतात. ग्रामसंरक्षण व पीक संरक्षण म्हणून काम करीत तसेच जंगलातील मोहाचे फुले वेचणे, डिंक गोळा करून विकणे किंवा खाण्याकरीता वापरतात. ही जमात ताडोबा जंगलाच्या सानिध्यात असल्याने व शेती ही जंगलालगत लागून असल्याने वन्यप्राणी, डूकरे, सांबर, चितर, वाघ, कोल्हे, ससे शेतात जावून यांची पिके खाणे, नासधुस करणे यासारखे प्रकार करीत असल्याने त्यांच्या शेतीतून अल्पप्रमाणात उत्पादन होते. आजही बहुतांश लोक जंगलातील तेंदूपत्ता, वाघाट्या गोळा करून विकण्याचे काम करतात. या भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने त्यांच्या जीवनातील प्रगतीच्या वाटा कमी आहेत. त्यामुळे त्यांच्यात नैराश्यतेचे वातावरण पाहावयास मिळते.

**माना जमातीच्या समस्या**

**१) शैक्षणिक समस्या :** बहसुंख्य आदिवासी माना जमातीच्या कुटुंबियांना आपल्या अस्तित्वासाठी झगडावे लागते. त्यांना शिक्षणापेक्षा रोटी महत्त्वाची आहे. शासनाने त्यांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा स्थापन केल्या. या शाळामधून गणवेश, पुस्तके, पाट्या, विद्यावेतन वगैरे दिले जाते. परंतु गरीबी व अज्ञानामुळे माना जमातीच्या मुलांचे शाळेत उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी आहे. आश्रमशाळा ह्या मोठ्या शहरामध्ये असल्याने लहान वयात मुलांना पालक ठेवू इच्छित नाही. त्यासोबत आश्रमशाळेत मुलींच्या लैंगिक छळाचे प्रकार फार मोठ्या प्रमाणात उघडकीस आल्याने पालक मुलींना शाळेत पाठविण्यास धजावत नाहीत. आश्रम शाळेतील शैक्षणिक वातावरण आजच्या स्पर्धेच्या शैक्षणिक वातावरणाशी मिळते-जुळते नसल्याने काही मुले शिक्षण घेतात खरे, पण पुढे शैक्षणिक स्पर्धेत तो टिकू शकत नसल्याने बहुतांश मुले उच्च शिक्षणापासून वंचित आहेत.

**२) जंगलविषयक धोरणाच्या समस्या :** आदिवासी माना जमात बहुतांश ही जंगलाच्या सानिध्याने राहत असल्याने मोहाचे फुले वेचणे, डिंग गोळा करणे, हिरडा बिब्बा, तेंदूची पाने व फळे, कंदमुळे गोळा करून विकणे असा व्यवसाय करीत असत. काही लोक शेती करतात. शेती ही जंगलाला लागून असल्याने डुक्कर, सावज व अन्य प्रकारचे प्राणी रात्रीच्या वेळी शेतात येवून पिके खातात. त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. शासनाचे वन धोरणे व नियमांमुळे या जमातीचा वनावरील हक्क संपृष्टात आला. यामुळे माना जमातीसमोर उपजिविकेचा प्रश्न उभा राहिला.

**३) कृषी विषयक समस्या :** या जमातीतील लोक वैयक्तिक व सामुहिक पद्धतीने शेती करतात. प्रामुख्याने तांदुळ, कापूस, हरभरा, गहू या पिकांचे उत्पादन घेतात. तांदळाच्या शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. या लोकांकडे पाण्याच्या सिंचनाच्या सुविधांचा अभाव असल्याने व खर्च जास्त असल्याने ही शेती त्यांना परवडत नाही. शासनाने त्यांच्यासाठी जलसिंचनाच्या सोई व काही अवजारांच्या योजना जरी निर्माण केल्या असल्या तरी त्या त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे शेतीतून अल्पप्रमाणात उत्पादन होते. शिवाय बऱ्याच वेळा अवकाळी पाऊस, दुष्काळ यामुळे काही शेतकरी आत्महत्याही करतात. त्यांच्यातील अज्ञानामुळे व्यापारी कमी किंमतीमध्ये माल खरेदी करतो. त्यामुळे त्यांच्या वाट्याला कमी उत्पादन मिळते. काही शेतकऱ्यांच्या जमीनी शासनाने कालवे, कार्यालये, पर्यटन स्थळे निर्माण करण्यासाठी ताब्यात घेतल्या. कंत्राटदार व सावकार यांनी आमिष दाखवून त्यांच्या जमीनी विकत घेतल्या.

त्यामुळे ते भूमिहीन होवून त्यांच्यासमोर रोजगाराच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

४) **राजकीय समस्या :** लोकशाहीत सहभागी होण्यासाठी घटनेनुसार या जमातीच्या लोकांना मतदान करणे, निवडणूकीत सहभागी होणे हे अधिकार दिलेले आहेत. ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीने आदिवासी महिलांना राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्याची संधी निर्माण करून दिली. परंतु या जमातीतील लोक स्वतःच्या मतदानाची किंमत कशी आहे हे कधी त्यांनी ओळखले नाही. मोठ्या उमेदवाराच्या अमिषाला बळी पडून ते आपले मतदान त्यांच्या सल्ल्याने करतात. या जमातीतील तीन व्यक्ती महाराष्ट्राच्या विधानसभेवर निवडून आले पण त्यांनीही जमातीच्या विकासासाठी पाहिजे त्याप्रमाणात कोणतेही कार्य न केल्याचे दिसून येते. महिलांना ग्रामपंचायत, नगरपरिषद, पंचायत समिती व जिल्हापरिषद याठिकाणी उमेदवारी मिळून त्या निवडून येतात. परंतु पक्षाच्या दडपणाने त्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होवू शकत नाही. शिवाय त्या बाहुल्या बनून राजकीय व्यवस्थेत सहभागी होतांना दिसून येतात. त्यामुळे योग्य अशा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील मानवी हक्कांच्या समस्या समोर उभ्या आहेत.

५) **जात पळताळणीच्या समस्या :** आदिवासी जमातींना शासकीय नोकरीत लागण्यासाठी जातपडताळणीचे प्रमाणपत्र मिळवावे लागते. त्याशिवाय त्यांना शासकीय नोकरीत किंवा वैद्यकीय, कृषी क्षेत्रातील पद व इतर उच्च शिक्षणासाठी या जातपडताळणी प्रमाणपत्र असल्याशिवाय त्यांना प्राधान्य दिले जात नाही. परंतु शासनाने जाणिवपूर्वक या जमातीच्या जातपडताळणीचे प्रमाणपत्र थांबवून त्यांना शासकीय नोकरीत किंवा इतर क्षेत्रामध्ये त्यांचा विकास होण्यापासून थांबविले आहे. त्यासंदर्भात या जमातीने न्यायालयात धाव घेवून केसही जिंकली. परंतू प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने या जमातीला शासकीय योजनांपासून दूर ठेवण्याचा हा शासनाचा हेतू आहे. त्यामुळे या जमातीचा जो विकास व्हावयाचा आहे तो होत नाही. त्यामुळे जातपडताळणी प्रमाणपत्र अभावी विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागत आहे. नोकरीसाठी निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नेमणुकीच्या जागी जातपडताळणी अभावी रुजू करून घेतले जात नाही. शासकीय कर्मचाऱ्यांना नोकरीमध्ये पदोन्नती देतांना जातवैधता प्रमाणपत्र अभावी पदोन्नती पासून व लोकशाही प्रणालीत राखीव जागेवर निवडणूक लढवितांना पात्र उमेदवारास निवडणूकीपासून आणि शेतकरी, शेतमजूरांना शासनातर्फे मिळणाऱ्या विविध योजनांच्या लाभापासून जातवैधता प्रमाणपत्रा अभावी वंचित राहावे लागत आहे.

**निष्कर्ष**

कोणत्याही जमातीला त्यांच्या मानवी हक्कांपासून वंचित ठेवल्यास त्या जमातीतील लोकांचा सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास होवू शकत नाही. लोकशाही शासन प्रक्रियेत सर्व जाती समुदायांचा जेव्हा सर्वांगीण विकास होईल तेव्हाच लोकशाही ही चिरकाल टिकून राहते. यासाठी शासनाने माना जमातीचा सर्वांगीण विकास, त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यांच्यात मानवी हक्काची जाणिव व जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

१) प्रा.व्ही.बी.पाटील, मानवी हक्क, के.सागर पब्लिकेशन, पुणे, २००९.
२) Universal Declaration of Human Rights १९४८.
३) प्रा.व्ही.बी.पाटील, मानवी हक्क, के.सागर पब्लिकेशन, पुणे, २००९.
४) तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर, मानवी हक्क, युनिक ॲकॅडमी, पुणे, २०१५.
५) प्रा.पी.के.कुलकर्णी, मानवी हक्क, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३.
६) प्रा.चंद्रकांत मिसाळ, मानवी हक्क व जबाबदाऱ्या, व्हिजक ॲकॅडमी, पुणे, २०११.
७) http://mr.vikaspedia.in/social-welfare
८) imperial Gazet of India १९९१.
९) Indian Costitution.
१०) संजीव श्रा. शेरकर, माना समाज सत्यशोध, माना शक्ती प्रकाशन, नागपूर, २०१६.
११) R.V.Rasel, The Tribal and Caste of the Central Provisions of India.
१२) दत्ता सांगोलकर, मानवी हक्क, जिज्ञासा प्रकाशन, पुणे, २०१४.